# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 18 September 2025
# Time 18.10 to 18.20
# Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – १८ सप्टेंबर २०२५ सायंकाळी ६.१०

****

- आयटीआय संस्थांच्या अद्ययावतीकरणासाठी केंद्र सरकार निधी देणार–केंद्रीय अर्थमंत्र्यांचं आश्वासन
- मतदान प्रक्रियेत घोटाळा झाल्याचा राहुल गांधी यांच्याकडून पुनरुच्चार–निवडणूक आयोगाने मात्र आरोप फेटाळले
- कुपोषण कमी करण्यात अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांचं योगदान मोलाचं–महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांचे गौरवोद्गार

आणि

- होमिओपॅथिक डॉक्टरांची महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये स्वतंत्र नोंदणी करण्याविरोधात डॉक्टरांचा लाक्षणिक संप

****

सर्व राज्यांमधल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना अर्थात आटीआय संस्थांना कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित केंद्रांमध्ये अद्ययावतीकरण करण्यासाठी गरजेचा असलेला निधी केंद्र सरकार देईल, असं आश्वासन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी दिलं आहे. आज नवी दिल्लीत भारतीय गुणवत्ता व्यवस्थापन फाउंडेशनच्या परिसंवादात बोलतांना त्यांनी ही बाब नमूद केली. त्या म्हणाल्या –

**बाईट – केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण**

गेल्या काही अर्थसंकल्पांमध्ये नागरिकांच्या कौशल्य विकासासाठी सरकारनं तरतुदी केल्या असून, उद्योगविश्वाच्या बदलत्या गरजांशी जुळवून घेण्यासाठी आयटीआयचा कायापालट होत असल्याचं सीतारामन यांनी सांगितलं.

****

राज्यशासनाच्या ‘महाज्ञानदीप’ पोर्टलवर, भारतीय ज्ञान प्रणालीवर आधारित पहिला ऑनलाईन अभ्यासक्रम खुला करण्यात आला आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रासह दोन क्रेडिट्स मिळणार असून, ते त्यांच्या अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिटमध्ये जमा होतील. विद्यार्थ्यांना आपल्या मातृभाषेत आंतरराष्ट्रीय दर्जाचं शिक्षण देण्याच्या उद्देशानं हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे.

✽✽✽✽

देशभरातल्या मतदान प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात घोटाळा झाल्याच्या आरोपाचा लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पुनरुच्चार केला आहे. ते आज नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलत होते. महाराष्ट्रातल्या राजुरा आणि कर्नाटकातल्या आळंद विधानसभा मतदार संघाचा उल्लेख करत, बनावट अर्ज, काही सॉफ्टवेअर वापरुन मतदारांची नावं वगळणं, बोगस मतदार घुसवणं हे प्रकार झाल्याचा दावा गांधी यांनी केला. राजुरा मतदारसंघात सहा हजार ८५० मतचोरी झाल्याप्रकरणी पोलिसांनी एफआयआरही दाखल केल्याचा दावा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.

दरम्यान, राहुल गांधी यांचे सर्व आरोप हे निराधार असल्याचं केंद्रीय निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. ऑनलाइन पद्धतीने मतदार वगळता येत नाहीत, असं आयोगानं सांगितलं आहे.

✽✽✽✽

राज्यभरात पाणंद आणि शिवरस्ते अतिक्रमणमुक्त करण्यासाठी युद्धपातळीवर मोहीम राबवून नागरिकांना दिलासा द्यावा, असं आवाहन राज्याचे जलसंपदा मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलं आहे. ते आज अहिल्यानगर जिल्ह्यातील राहाता इथं सेवा पंधरवड्याच्या शुभारंभप्रसंगी बोलत होते.

✽✽✽✽

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त ‘चलो जीते हैं’ हा राष्ट्रीय पुरस्कार विजेता चित्रपट, काल पुनर्प्रदर्शित करण्यात आला. स्वामी विवेकानंदांच्या तत्वज्ञानाने प्रभावित झालेला नारू नावाचा एक लहान मुलगा, आपल्या छोट्या जगात बदल घडवून आणण्याचा कसा प्रयत्न करतो, हे या चित्रपटातून दाखवण्याचा प्रयत्न केलेला आहे. हा चित्रपट म्हणजे, स्वामी विवेकानंदांचं तत्वज्ञान, विचार आणि सेवेच्या संदेशाला आदरांजली असल्याचं, केंद्रीय माहिती आणि प्रसारण

मंत्रालयाने म्हटलं आहे. छत्रपती संभाजीनगर इथल्या आयनॉक्स चित्रपटगृहात पुढचे चार दिवस हा चित्रपट दाखवला जाणार आहे.

****

सेवा पंधरवड्याअंतर्गत आज नवी दिल्लीत आकाशवाणी कार्यालयात सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी स्वच्छता शपथ घेतली. आकाशवाणीचे महासंचालक राजीवकुमार जैन यांनी सर्वांना स्वच्छतेची शपथ दिली. स्वत: कचरा करू नका, इतरांनाही करू देऊ नका, असं आवाहन या शपथेतून करण्यात आलं आहे. प्रत्येक कर्मचाऱ्याने वर्षभरातून किमान शंभर तास स्वच्छतेसाठी द्यावेत, असं आवाहन जैन यांनी केलं आहे.

****

मुंबईसह राज्यात कुपोषण कमी करण्यास अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांचं योगदान मोलाचं असून, सुपोषित भारतासह कुपोषणमुक्त महाराष्ट्र घडवण्याची संधी आपल्याला लाभली असल्याचं, महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी म्हटलं आहे. आठव्या राष्ट्रीय पोषण माह अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ तटकरे यांच्या हस्ते आज मुंबईत झाला त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी बाळाचे पहिले सुवर्णमयी एक हजार दिवस या पुस्तिकेचं प्रकाशन त्यांच्या हस्ते करण्यात आलं. राज्यातील सर्व अंगणवाडीमध्ये १७ सप्टेंबर ते येत्या १६ ऑक्टोबर या कालावधीत आठवा राष्ट्रीय पोषण महिना साजरा करण्यात येत आहे.

****

दरम्यान तटकरे यांनी, आज छत्रपती संभाजीनगर इथं सातारा परिसरातल्या भगवान बाबा बालिका आश्रमास भेट देऊन तिथल्या मुलींना मिळणाऱ्या सेवा सुविधांची पाहणी केली. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यावेळी उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी मुलींशी संवाद साधत साधला. या मुलींनी आपल्या कलागुणांचं त्यांच्यासमोर सादरीकरण केलं.

****

महिला आणि बालकल्याणासाठी केंद्र शासनाकडून गेल्या दशकभरात विविध योजना राबवण्यात आल्या. या योजनांबाबत छत्रपती संभाजीनगर इथल्या विधीज्ञ रेणुका घुले यांनी संक्षिप्त आढावा घेतला. त्या म्हणाल्या –

**बाईट – विधीज्ञ रेणुका घुले**

****

होमिओपॅथिक डॉक्टरांची महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये स्वतंत्र नोंदणी करण्याच्या निर्णयाविरोधात ॲलोपॅथी शाखेच्या वैद्यकीय व्यावसायिकांनी आज लाक्षणिक संप पुकारला. छत्रपती संभाजीनगर इथल्या सुमारे ५५० रुग्णालयांनी तसंच अडीच हजारावर डॉक्टरांनी या संपात सहभाग घेत निदर्शनं केली. या संदर्भात इंडियन मेडिकल कौन्सिलचे छत्रपती संभाजीनगर शाखेचे अध्यक्ष डॉ अनुपम टाकळकर यांनी संघटनेची भूमिका स्पष्ट केली –

**बाईट – डॉ अनुपम टाकळकर**

****

लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यात पुरामुळे झालेल्या नुकसानाची सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज पाहणी केली. नुकसानीचे पंचनामे तातडीने करुन तेरणा नदीवर उजनी गावाजवळ पूल उभारण्यासाठी प्रस्ताव सादर करावा, अशा सूचना त्यांनी दिल्या.

दरम्यान, लातूर जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे निलंगा तालुका मनसे अध्यक्ष सचिन बिराजदार यांनी हरी जवळगा इथं आमरण उपोषण पुकारलं आहे. या उपोषणाची दखल न घेतल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा मनसेने दिला आहे.

****

हिंगोली जिल्ह्यात बाधित शेतकऱ्यांच्या नुकसानीचे आठ दिवसाच्या आत पंचनामे करुन दसऱ्यापूर्वीच मदत मिळऊन देऊ असं आश्वासन पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिलं आहे. ते आज डोंगरगाव पूल तसंच धांडे पिंपरी इथं नुकसानग्रस्त शेतीची पाहणी केल्यानंतर बोलत होते.

****

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक मधुभाई कुलकर्णी यांचं आज छत्रपती संभाजीनगर इथं निधन झालं, ते ८७ वर्षांचे होते. तरुण स्वयंसेवकांसाठी त्यांनी लिहिलेल्या “अथातो संघजिज्ञासा” या पुस्तकाचा अनेक भाषांमध्ये अनुवाद झाला आहे. त्यांच्या इच्छेनुसार त्यांचे पार्थिव शरीर देहदान रुपात छत्रपती संभाजीनगर इथल्या रामचंद्र इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसच्या आर के दमाणी वैद्यकीय महाविद्यालयाकडे सुपूर्द करण्यात आलं.

****

ज्येष्ठ इतिहास संशोधक आणि शिवचरित्रकार गजानन भास्कर मेहेंदळे यांच्या पार्थिव देहावर आज पुण्यात स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. मेहेंदळे यांचं काल हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झालं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गजानन मेहेंदळे यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

****

बंजारा समाजाचा अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करण्याच्या मागणीसाठी नांदेड जिल्यातील किनवट इथं सकल बंजारा समाज किनवट आणि माहूर तालुका आरक्षण अनुसूचित जमाती समितीच्या वतीनं मोर्चा काढण्यात आला. यावेळी किनवटच्या सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकाऱ्यांना मोर्चेकऱ्यांनी निवेदन सादर केलं.

****

चीनमध्ये सुरू असलेल्या चायना मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पीव्ही सिंधूनं आज थायलंडच्या खेळाडूचा सरळ गेममध्ये पराभव करून महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. उपांत्यपूर्व फेरीत सिंधूचा सामना दक्षिण कोरियाच्या खेळाडूसोबत होईल.

****